# संमतीवयातील बदल

**भाग ६**

देशस्तरावर दर १ तासाला महिलांवरील अत्याचाराशी संबंधित ४९ केसेस दाखल होतात, असे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने प्रसिद्ध केलेल्या सन २०२१ च्या अहवालात नमूद केले आहे. त्यात बलात्काराच्या तक्रारींचा समावेश आहे. या अहवालातील तक्त्यात बलात्काराच्या केसेसमधील आरोपींची वर्गवारी करताना केवळ ओळख असलेले, कुटुंबातील सदस्य, कौटुंबिक मैत्री असलेले, शेजारी राहणारे, मालक किंवा कामावरील परिचित व्यक्ती, मित्र, ऑनलाईन मित्र, लिव्ह इन मधील लग्नाचे आमिष दाखविणारा जोडीदार, विभक्त झालेला नवरा असे ओळखीचे प्रकार सांगितले आहेत व त्यांची स्वतंत्र आकडेवारी प्रसिद्ध केलली आहे. हा अहवाल असे सांगतो की, बलात्काराच्या ९६.१% केसेसमध्ये आरोपी हे पिडितेस आधीपासून ओळखणारे/परिचित होते. मात्र यामध्ये विवाहांतर्गत बलात्कारांचा समावेश नाही कारण भारतीय कायद्यात तशी तरतूद नाही. त्यामुळे हि कृत्ये अनोंदीत (अनरजिस्टर) राहतात.

लॉर्ड मेकॉले यांनी केलेल्या बलात्काराच्या व्याख्येत विवाहसंबंधातील शरीरसंबंध स्पष्टपणे वगळलेले होते. १९२५ साली सर अलेक्झांडर मुद्दीमन यांनी जोरदार मागणी केल्यानंतर विवाहसंबंधातील बलात्कारासाठी संमतीवय १३ वर्षे आणि बलात्काराच्या गुन्ह्यासाठी संमतीवय १४ वर्षे असा बदल करण्यात आला. प्रथमच 'वैवाहिक संबंधातील बलात्कार' व 'इतर प्रकारचा बलात्कार' अशी विभागणी करण्यात आली. त्यानंतर सन १९२७ मध्ये डॉक्टर हरिसिंग गौर यांनी

संमतीवय वाढवावे अशी मागणी केली. त्यावर विचार करण्यासाठी एक अभ्यास समिती नेमण्यात आली. ह्या समितीने अनेक सूचना केल्या. लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय ठरविण्यापेक्षा मुलींच्या विवाहासाठी विशिष्ट वयाची अट निश्चित करावी, जर पती पत्नीच्या संबंधांमध्ये बळजबरी झाली तर त्याला 'बलात्कार' (मॅरीटल रेप) असे न म्हणता 'वैवाहिक गैरवर्तन' (मॅरीटल मिसबिहेव्हीअर) असे म्हणावे, हा वैवाहिक गैरवर्तनाचा गुन्हा पूर्णपणे वेगळा व स्वतंत्र असावा, हा गुन्हा सिद्ध झाला तर त्यास १० वर्षांपर्यंत शिक्षा देण्यात यावी हे आणि असे वेगळे आणि विचारप्रवृत्त करणारे मुद्दे ह्या अभ्यास समितीने मांडले होते. ह्या सूचना स्वीकारण्यात आल्या नाहीत. पण सातत्याने संमतीवय, विवाहांतर्गत बलात्कार यावर चर्चा सुरूच राहिल्या. नंतर सन १९४९ मध्ये लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय १६ वर्षे करण्यात आले.

दरम्यान, भारतीय दंड संहितेच्या तरतुदीनुसार बलात्काराच्या गुन्ह्यासाठी पहिली शिक्षा १९२७ साली देण्यात आली. ती केस होती किशन सिंग वि. एम्परर. नंतर १९५५ साली कायद्यात बदल झाला व या गुन्ह्यासाठी जन्मठेपेची शिक्षा नमूद करण्यात आली.

सन १९७२ मध्ये 'मथुरा' बलात्कार प्रकरण खूप गाजले. त्याविषयी माहिती घेऊ. मथुरा हि अनाथ मुलगी गामा नावाच्या तिच्या भावाबरोबर राहत होती. त्यांच्या मालकाचे नाव होते नुशी. नुशीचा चुलत भाऊ अशोक आणि मथुरा यांचे प्रेम जुळले व ती दोघे एके दिवशी लग्न करण्यासाठी गावातून निघून गेले. मथुराच्या भावाला हे माहित नसल्याने त्याने चंद्रपूर पोलीस ठाण्यात जाऊन अशोक आणि नुशी यांनी मथुराला पळवून नेले आहे अशी तक्रार नोंदविली. त्याच दिवशी म्हणजे २६ मार्च

१९७२ रोजी मथुरा, नुशी, अशोक सगळ्यांना पकडून पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सगळे सोपस्कार पूर्ण झाल्यावर रात्री १०.३० च्या सुमारास हेडकॉन्स्टेबल तुकाराम, कॉन्स्टेबल गणपत यांनी मथुराला पोलीस ठाण्यात थांबवून ठेवले. इतरजण बाहेर गेल्यानंतर तुकाराम व गणपत यांनी पोलीस ठाण्याचे दार लावून घेतले व तिथेच मथुरावर बलात्कार केला. पोलीस ठाण्याच्या बाहेर हळू हळू लोक जमा झाले. मग तुकाराम बाहेर आला व त्याने 'मथुरा आतमध्ये नाही. ती  तर केव्हाच निघून गेली' असे म्हणत लोकांना दमात घ्यायला सुरुवात केली. पण तेव्हढ्यात स्वतः मथुराच आतून बाहेर आली व तिने घडलेली घटना सांगितली. लोक संतापले. हेडकॉन्स्टेबल बाबुराव यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेऊन तक्रार नोंदविण्यात आली. हि केस सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेली. आरोपी तुकाराम आणि गणपत निर्दोष सुटले. मात्र या केसमुळे कायद्यात कोणते बदल झाले, ते जाणून घेऊया पुढच्या भागात.

**ॲड. प्रज्ञा हेन्द्रे जोशी**

**अहमदनगर, मो. ९८५००७५४४३**